# अंदाजपत्रकीय तूट व अर्थववस्थेवरील तुटीचे परिणाम

**डॉ. पांडुरंग सदाशिव डांगे**
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय,
अर्जुनी मोरगाव, जिल्हा गोंदिया – ४४१७०१
भ्रमणध्वनी ९४२३३८३८७६

**प्रस्तावना**

तुटीचा अर्थभरणा म्हणजे जेव्हा अंदाजपत्रकात नमूद करण्यात आलेला शासनाचा चालू खर्च हा शासनाला मिळणाऱ्या महसुली उत्पन्नापेक्षा जास्त असतो तेव्हा त्या अंदाजपत्रकाला तुटीचे अंदाजपत्रक म्हणतात. तुटीचा अर्थभरणा ही संज्ञा यापेक्षा व्यापक आहे. जेव्हा एकूण अंदाजपत्रकीय खर्च (भांडवली + महसुली जमा) हा एकूण अंदाजपत्रकीय जमेपेक्षा (भांडवली जमा + महसुली) जास्त असते आणि शासन अंदाजपत्रकात शिल्लक राहिलेली तूट भरून काढण्याकरिता शासनास जी साधनसामुग्री जुळवावी लागते त्याला तुटीचा अर्थभरणा म्हणतात व शासन अंदाजपत्रकातील अशी तूट भरून काढण्याकरिता जे धोरण आखले जाते त्याला तुटीची खर्चनीती म्हणतात.

जेव्हा शासनाला अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेल्या कराच्या आधारे अंदाजपत्रकात नमूद करण्यात आलेला खर्च भागविणे शक्य नसते तेव्हा शासन अंदाजपत्रकात निर्माण झालेली तूट भरून काढण्याकरिता तुटीचा अर्थभरणा करते. विकसनशील राष्ट्रातील जनतेची बचतक्षमता खुप कमी असते. यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेत भांडवल उभारणीचा दरसुद्धा खूप कमी असतो. अशा राष्ट्रांना आपल्या विकासाच्या योजना महसुली अंदाजपत्रकाच्या माध्यमातून भागविणे शक्य नसते. या कारणामुळे विकसनशील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेमध्ये तुटीचा अर्थभरणा मोठ्या प्रमाणात केला जातो.

**संशोधनाचा उद्देश**

- भारत सरकारच्या अंदाजपत्रकीय तुटीचा अभ्यास करणे.
- तुटीचा अर्थभरणा करण्यासाठी योजनात येणाऱ्या अभ्यासाचा परिणाम करणे.
- तुटीच्या अर्थभरण्यामुळे अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

**शोध निबंधाची संशोधन पद्धती**

शोध निबंधातील अभ्यास व द्वितीय समंकावर अवलंबून आहे. समंकाचे संकलन हे विषयाशी संबंधित विविध पुस्तके, मासिके, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळावरून करण्यात आले आहे.

**अंदाजपत्रकातील तुटीचे प्रकार**

अंदाजपत्रकातील तुटीचे प्रकार अंदाजपत्रकात खालील प्रकारे तुट दाखविली जाते.

**१) महसुली तुट**

अर्थसंकल्पामध्ये अंदाजित करण्यात आलेला महसुली जमा ही महसुली खर्चापेक्षा कमी असेल तेव्हा जी तुट निर्माण होते त्या तुटीला महसुली तूट असे म्हणतात.

महसुली खर्च – महसुली जमा = महसुली तुट

**२) राजकोषीय तूट**

अर्थसंकल्पातील महसुली जमा व भांडवली जमा गटातील नवीन कर्ज वगळता इतर रक्कम यामधून अंदाजपत्रकीय खर्च वजा केल्यास जी तूट शिल्लक राहते त्याला राजकोषीय तूट असे म्हणतात.

एकूण अंदाजपत्रकीय खर्च – महसुली जमा + शासनाने वसूल कलेली कर्जे + इतर भांडवली प्राप्ती = वित्तीय तूट

**३) अंदाजपत्रकीय तूट**

अर्थसंकल्पीय जमेमधून, अर्थसंकल्पीय खर्च वजा केल्यास जी तूट शिल्लक राहते त्याला अंदाजपत्रकीय तूट असे म्हणतात.

अर्थसंकल्पीय खर्च – अर्थसंकल्पीय जमा = अर्थसंकल्पीय तूट

**तुटीच्या अर्थ भरण्याचे उद्देश**

खालील कारणांकरिता तुटीच्या अर्थभरणा केला जातो.

**१) युद्ध खर्च भागविणे**

युद्धाचा खर्च हा नियोजित खर्च नसतो. जेव्हा एखाद्या राष्ट्रावर युद्ध लादले जाते तेव्हा त्या राष्ट्राला आपल्या महसुली खर्चाला आणि विकास योजनेला कात्री लावून युद्ध खर्च भागवावा लागतो, पण जेव्हा उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीच्या आधारे युद्धखर्च भागविणे शक्य नसते तेव्हा शासनाला तुटीचे अंदाजपत्रक सादर करण्याशिवाय कोणताही पर्याय नसतो.

**२) पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे**

विकसनशिल राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत रोजगाराची समस्या मोठ्या प्रमाणात असते. बरोजगार व्यक्तीला रोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने शासनापुढे विकासकामे सुरू करणे हाच एकमेव पर्याय असतो. ही कामे सुरू करण्याकरिता मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. विकसनशील राष्ट्राची कर देण्याची क्षमता आणि बचत क्षमता कमी असल्यामुळे शासनाला आवश्यक त्या प्रमाणात भांडवल गोळा करणे शक्य नसते. अशा वेळी शासन तुटीचा अर्थभरणा करून भांडवल उभे करते आणि विकासाची कामे सुरू करते.

**३) मंदीची अवस्था दूर करणे**

विकसित अर्थव्यवस्थेमध्ये उत्पन्न वाढीचा दर मोठ्या प्रमाणात असतो पण त्या प्रमाणात उपभोग दर नसतो. त्यामुळे उत्पादनाला परिणामकारक मागणी कमी होते. उत्पादनाला मागणी कमी झाल्यामुळे अर्थव्यवस्थेत मंदी येते. मंदीच्या अवस्थेत कारखाने बंद पडून बेकारी वाढते. अशा अवस्थेत बेरोजगारी दूर करण्याच्या उद्देशाने धोरण आखावे लागते. या अवस्थेत शासन तुटीचा अर्थसंकल्प सादर करून विकासकामे सुरू करते. बेरोजगारांना काम मिळाल्यामुळे मंदीची अवस्था दूर होण्यास मदत होते.

**४) आर्थिक विकास**

विकसनशील राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासाच्या योजना सुरू केल्या जातात, पण त्या प्रमाणात त्या राष्ट्रांकडे भांडवल निर्मितीचा अभाव असतो. अशा अवस्थेत तुटीचा अर्थभरणा करून विकासाची कामे सुरू केली जातात.

**५) साधनसामुग्रीचा उपयोग करणे**

अविकसित राष्ट्रांमध्ये जमीन, खनिजे, पाणी, मनुष्यबळ अशी नैसर्गिक संपत्ती वापराविना पडून असते. या संपत्तीचा उपयोग करण्याकरिता मोठ्या प्रमाणात साधनसामुग्रीची गरज असते. अविकसित राष्ट्रांना केवळ अंदाजपत्रकीय सामुग्रीच्या आधारे विकास योजना राबविणे आणि साधनसामुग्रीचा उपयोग करणे शक्य नसते. तेव्हा तुटींच्या अर्थभरणेचा उपयोग केला जातो.

**तूट भरून काढण्याकरिता येणाऱ्या उपाययोजना**

शासन अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्याकरिता खालील मार्गाचा अवलंब करते.

**१) कर वाढविणे**

शासन प्रचलित करामध्ये सुधारणा करणे, नवीन कराची आकारणी करणे किंवा करामध्ये बदल करणे

इत्यादी मार्गाचा अवलंब करणे. जेव्हा शासनाला कराच्या रकमेतून तूट भरून काढणे शक्य नसेल तेव्हा शासन दुसऱ्या मार्गाचा अवलंब करते. या उपायाचा अर्थ व्यवस्थेवर कोणताही परिणाम होत नाही कारण या प्रकारामध्ये जनतेकडील अतिरिक्त चलनाचे शासनाकडे हस्तातरण होते. शासन हा पैसा विकास योजनेवर खर्च करते त्यावेळी याच पैशाचे हस्तांतरण पुन्हा जनतेकडे होते. या प्रकारामुळे शासनाचा विकास कार्यक्रम राबविला जातो आणि महागाईमध्ये कोणतेही वाढ होत नाही. यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये संतुलन कायम राहते. परंतु विकसनशील राष्ट्रातील जनतेची उत्पन्न क्षमता कमी असल्यामुळे शासनाला एका विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक कर जनतेवर आकारता येत नाही. जर क्षमतेपेक्षा अधिक कर आकारणी केल्यास तर जनतेच्या खरेदी क्षमतेत घट होते. पर्यायाने अर्थव्यवस्थेत मंदी निर्माण होते.

**२) कर्जे काढणे**

शासनाला अंतर्गत आणि बहिर्गत बाजारातून कर्जे घेण्याचा अधिकार आहे. कर्जे काढणे म्हणजे तात्पुरता कालावधीकरिता रक्कम उसनवारीने घेणे. कर्जामुळे शासनावर देयता येते. परंतु तात्पुरती बाब म्हणून शासन कर्जाचा मार्ग अवलंबते जर शासनाने प्रमाणापेक्षा जास्त कर्जे काढल्यास त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. अविकसित राष्ट्रातील जनतेची बचतक्षमता कमी असल्यामुळे शासन अंतर्गत बाजारपेठातून कर्जे घेऊ शकत नाही.

**३) चलन निर्मिती करणे**

अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये अंदाजपत्रकातील तूट भरून काढण्याकरिता चलन निर्मितीचा मार्ग मोठ्या प्रमाणात अवलंबिला जातो. चलन निर्मिती करणे म्हणजे शासनाने देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून उधार घेणे होय. यामुळे नागरिकांच्या हातातील चलनात वाढ होते आणि त्याचा परिणाम भाववाढीवर होतो.**तूटीच्या अर्थ भरण्यामुळे अर्थ व्यवस्थेवर होणारे परिणाम**

जर शासनाने आपला खर्च भागविण्याकरिता मोठ्या प्रमाणात तुटीचा अर्थभरणा केल्यास त्याचा अर्थव्यवस्थेवर खालील परिणाम होतो.

**१) चलनवाढ**

जर शासनाने देशांतर्गत कर्ज काढून तुटीचा अर्थभरणा केल्यास अर्थव्यवस्थेवर कोणताही परिणाम होत नाही. कारण या अवस्थेत नागरिकांकडील अतिरिक्त चलनाचे हस्तांतरण शासनाकडे होते आणि शासन तो पैसा विकासकामावर खर्च करून जनतेला परत करते. यामुळे चलन पुरवठ्यात कोणतीही वाढ होत नाही आणि त्याचा परिणाम किंमत पातळीवर होत नाही. जर शासनाने बहिर्गत कर्जाद्वारे किंवा नवीन चलनाची निर्मिती करून तुटीचा अर्थभरणा केला असेल तर चलन पुरवठ्यामध्ये वाढ होते. या घटनेमुळे अतिरिक्त चलन बाजारात येऊन चलन पुरवठ्यात वाढ होते.

**२) महागाईत वाढ**

चलन पुरवठा हा वस्तुच्या किंमतीवर परिणाम करणारा सर्वात मोठा घटक आहे. नागरिकांच्या हातातील चलनात वाढ झाल्यामुळे त्यांची खरेदी शक्ती वाढते. जर देशात मागणीनुसार पुरवठा नसेल तर, त्याचा परिणाम महागाईच्या वाढीवर होतो. तुटीच्या अर्थभरण्यामुळे विकसनशील अर्थव्यवस्थेत चलन पुरवठा वाढतो. चलन पुरवठा वाढल्यामुळे जनतेच्या क्रयशक्तीत वाढ होते. जनतेच्या क्रयशक्तीत वाढ झाल्यामुळे परिणामकारक मागणी वाढते. ज्या प्रमाणात उत्पादनाला मागणी येते त्या प्रमाणात उत्पादनात वाढ न झाल्यामुळे वस्तुच्या किमती वाढतात व महागाई वाढते.

**३) पतनिर्मितीमध्ये वाढ**

जनतेच्या हातामधील चलनात वाढ झाल्यास जनता एकतर तो पैसा उपभोगाकरिता खर्च करते व शिल्लक राहिलेली रक्कम बचतीमध्ये गुंतविते. बचतीमध्ये वाढ झाल्यास बँकाकडील ठेवीमध्ये वाढ होते. बँकांकडील ठेवीत वाढ झाल्यास बँकेची पतनिर्मितीची क्षमता वाढते व बँका आपल्या खातेदाराना कर्जपुरवठा

करते. पतिनिर्मितीमध्ये वाढ होणे म्हणजेच एकप्रकारे नागरिकांकडील चलनात आणखी भर पडणे होय. या पतवाढीचा परिणाम भाववाढीवर होतो.

**४) सार्वजनिक खर्चात वाढ**

तुटीच्या अर्थभरण्याद्वारे भाववाढ झाल्यास त्याचा महत्त्वाचा परिणाम उत्पादक कामावर होतो आणि शासनाच्या विकास खर्चात वाढ होऊन प्रकल्पाची किंमत वाढते.

**५) सार्वजनिक खर्चात वाढ**

तुटीच्या अर्थसंकल्पाचा सर्वात मोठा परिणाम हा शासनाच्या सार्वजनिक कर्जाच्या वाढीवर होतो. २०००—११ या दशकात केंद्रीय अंदाजपत्रकातील राजकोषीय तोट्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्याचा परिणाम शासनाच्या सार्वजनिक कर्जाच्या वाढीवर झाला.

**भारत सरकारचे अंदाजपत्रक आणि त्यामधील तूट**

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे धोरण स्वीकारले. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून भारत सरकारने राष्ट्राच्या विकासाच्या अनेक योजना हाती घेतल्या. विकास योजनेवरील वाढता खर्च भागविण्याकरिता भारत सरकारने सन १९५९ पासून तुटीच्या अंदाजपत्रकाचा पर्याय स्वीकारला जो आजतागायत सुरू आहे. हे आपणास खालील तक्त्यावरून दिसून येईल.

| अ.क्र. | वर्ष | महसुली तूट | प्रमाण | प्राथमिक तूट | प्रमाण | राजकोषीय तूट | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९०—९१ | १८,५६० | ३.२ टक्के | २३,१३० | ४.५ टक्के | ४४,६३० | ७.७ टक्के |
| २ | २००६—०७ | ८,०२२ | १.९ टक्के | ४२,५७० | ३.५ टक्के | —७,७०० | ०.२ टक्के |
| ३ | २००७—०८ | ५२,५६९ | १.१ टक्के | २६,९१२ | २.५ टक्के | —४४११८ | ०.९ टक्के |
| ४ | २००९—१० | २,५३,४३९ | ४.५ टक्के | ३६,९९२ | ६.० टक्के | १,४४,७८८ | ३.२ टक्के |
| ५ | २०११—१२ | २,६९,८४४ | ३.४ टक्के | ४,००,९९८ | ४.६ टक्के | १,६०,२४१ | १.६ टक्के |
| ६ | २०१३—१४ | ३,५७,००८ | ३.१ टक्के | ५,०२,८५८ | ४.४ टक्के | १,२८,६०४ | १.१ टक्के |
| ७ | २०१४—१५ | ३,६२,४८६ | २.९ टक्के | ५,१२,६२८ | ४.१ टक्के | १,०१,२७४ | ०.८ टक्के |

**अंदाजपत्रकीय तूट कमी करण्यासाठी भारत सरकारने केलेल्या उपाययोजना**

राजकोषीय तूट कमी करण्यासाठी भारत सरकारने खालील उपाययोजना केल्या आहेत.

**१) वित्तीय जबाबदारी व अंदाजपत्रक व्यवस्थापन अधिनियम — २००३**

अंदाजपत्रकातील तूट ही केंद्र व राज्य सरकारच्या अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठी अडचण आहे. जी शासनाची इच्छा असूनही शासनाला दूर करता येत नाही अशा प्रश्नावर स्वयंशिस्त पाळणे हाच एक उपाय आहे. या दृष्टीने भारत सरकारने जुलै २००४ मध्ये वित्तीय जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन अधिनियम—२००३ मंजूर करून स्वत:च अंदाजपत्रकातील तूट कमी करण्याची जबाबदारी स्वीकारली. हा अधिनियम मंजूर करताना भारत सरकारने खालील अटींचा स्वीकार केला.

१. या अधिनियमान्वये दरवर्षी अंदाजपत्रकातील महसुली तूट ही स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ०.५ टक्के ने कमी करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आणि या धोरणानुसार ही लूट खालील प्रमाणे कमी करून सन २००७—०८ पर्यंत महसुली तूट शून्यावर आणण्याचे निश्चित करण्यात आले.

२. ही तूट कमी कमी करतांना प्रत्येक वर्षी सन २००४—०५ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ९ टक्के कमी करणे, सन २००५—०६ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ८ टक्के कमी करणे, सन २००६—०७ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ७ टक्के कमी करणे, सन २००७ —०८ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ६ टक्के कमी करणे असे निश्चित करण्यात आले.

३. रिझर्व्ह बँकेकडून प्रत्यक्ष उसनवारी न करणे.
४. संसदेत अंदाजपत्रक सादर करण्याबरोबर खालील दस्तऐवज संसदेत सादर करण्याचे ठरविण्यात आले.
  - ❖ मायक्रो एकॉनामिक्स फ्रेमवर्क स्टेटमेंट
  - ❖ फिस्कल पॉलिसी स्ट्रॅटेजिक स्टेटमेंट
  - ❖ मीडियम टर्म फिस्कल पॉलीसी स्टेटमेंट

५. कोणत्याही कर्जाची हमी घेण्याचे प्रमाण वित्तीय वर्षात स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ०.५ टक्के वर आणणे.
६. वित्तीय पारदर्शकता आणण्याकरिता अंदाजपत्रकाची आकडेवारी खुली करणे ज्यात कर्जाची घेतलेली हमी, देशाची सर्व मालमत्ता न मिळालेला महसूल इत्यादी आकडेवारी खुली करणे.

**रंगराजन समिती**

वित्तीय क्षेत्रात सुधारणा करण्याकरिता भारत सरकारने रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमली होती. या समितीने दिलेला हा अहवाल सार्वजनिक खर्चाचे कार्यक्षम व्यवस्थापन नावाने ओळखला जातो. डॉ. रंगराजन समितीने आपल्या अहवालात खालील शिफारशी केल्या आहेत.

१ शासनाने विकास व विकासेतर खर्च दोन्ही विभाग रद्द करून एकच गट तयार करावा आणि योजना आयोगाची जबाबदारी कमी करावी.
२ विकासाची संपूर्ण जबाबदारी ही शासनाकडे द्यावी.
३ वित्तीय धोरण, अंदाजपत्रक तयार करणे व वित्तीय निर्णय घेण्याची जबाबदारी वित्त मंत्रालयाकडे सोपवावी.

**समारोप**

भारत हा विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये मोडणारा देश आहे. स्वातंत्र्यापासून भारत सरकारने जनतेच्या कल्याणकारी विकासाचे धोरण स्वीकारले. याकरिता शासनाने विकासाच्या योजना हाती घेतल्या. त्याकाळात जनतेची उत्पन्नक्षमता कमी असल्यामुळे आणि भारत सरकारला कर्ज घेण्यास मर्यादा आल्यामुळे भारत सरकारने अर्थसंकल्पीय तुटीचा मार्ग स्वीकारला. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात या तुटीचा फारसा परिणाम जाणवला नाही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भारत सरकारने गाभ्याचे प्रकल्प उभारणीचा निर्णय घेतला आणि या प्रकल्पात गुंतवणूक करण्याकरिता मोठ्या प्रमाणात तुटीचा अर्थभरणा करण्यात आला. त्याचा तत्कालीन परिणाम म्हणजे महागाईमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून भारत सरकारच्या अंदाजपत्रकातील तूट सातत्याने वाढत आहे. तूटीच्या अर्थभरण्याचे परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसू लागल्यामुळे सन २००२ मध्ये भारत सरकारने तुटीच्या खर्चावर नियंत्रण आणण्याचे धोरण स्वीकारले. त्यावर उपाययोजना सुद्धा स्वीकारण्यात आल्या. सन २००८ मध्ये अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीमुळे शासनाच्या अर्थसंकल्पीय तुटीमध्ये वाढ झाली. सन २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेमध्ये आले. या सरकारचे अर्थमंत्री अरूण जेटली यांनी सुरूवातीपासून अर्थसंकल्पातील तुटीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गेल्या तीन वर्षामध्ये महागाईचा दर केवळ एका अंकावर स्थिर राहिला.

**संदर्भ सूची**

१. शास्त्री, डॉ. सुधाकर – 'भारतीय अर्थव्यवस्था', विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स, नागपूर.
२. भोसले व काटे – 'जागतिक अर्थव्यवस्था', फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती २०००
३. झामरे, डॉ. जी.एन. – 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र'
४. भारत सरकारचे अर्थसंकल्पीय अहवाल.
५. रिझर्व्ह बँकेचे अहवाल
६. वृत्तपत्रातील आणि वेबसाईटवरील लेख.